MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co.Ltd.

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY TRANSMISSION CO. LTD.**

कार्यकारी अभियंता
म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित,
चाचणी विभाग, नाशिक
५, प्रशासकिय इमारत, जुना सायखेडा रोड, जेल रोड, नाशिक रोड - ४२२१०१
Email Id. ee5150@mahatransco.in

क. काअ/चाचणी/नासिक/२१२ दि. ०२.०५.२०१७

**E-enquiry-II**

विषयः- चाचणी विभाग नाशिक अंतर्गत चाचणी कक्ष मालेगांव साठी AC वाहन भाडयाने घेणेबाबतचे कोटेशन मागविणे बाबत.

खालील नमुद केलेल्या कामाकरिता मोहोरबंद कोटेशन नामनिर्देशन केलेल्या लिफाफ्यात दि. ०८-०५-२०१७ पर्यत दुपारी १५.०० वाजेपर्यत किंवा तत्पुर्वी कार्यकारी अभियंता म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, चाचणी विभाग, ५, प्रशासकिय इमारत, जुना सायखेडा रोड, जेल रोड, नाशिक रोड नाशिक - ४२२१०१, या कार्यालयात पोहोचतील अशा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. शक्य झाल्यास तर कोटेशन त्याच दिवशी दुपारी १६.०० वाजता उघडण्यात येतील.

| कामाचे स्वरुप | कालावधी |
|---|---|
| चाचणी विभाग नासिक अंतर्गत, मालेगांव युनिटसाठी डिझेलवर चालणारी AC टुरिस्ट मारुती स्विप्ट डिझायर/महिंन्द्रा व्हेरिटो व वाहन चालकासह | १२ महिने. |

**आवश्यक अटी व शर्ती :-** १) वाहनासाठी आरटीओ प्रवासी परवाना व चालकाकडे वाहन चालविण्याचा अद्यावत परवाना असणे आवश्यक आहे. २) वाहनाची सरासरी धाव किमान १८ कि.मी./प्रती लिटर व वाहन AC असणे आवश्यक आहे. ३) वाहन नाशिक, अहमदनगर जिल्हयामध्ये आणि मुंबई पूणे व औरंगाबाद येथे कुठेही जाण्यासाठी वापरण्यात येईल. ४) वाहनाला कंपनीतर्फे फक्त डिझेल पुरविण्यात येईल. गाडीसाठी लागणारे इंजिन ऑईल, गाडीची दुरुस्ती, देखभाल, मजुरी, स्पेअर पार्टस, पंक्चर, ड्रायव्हरचा पगार, जास्त कामाचा मोबदला, मुक्कामाचा मोबदला व आरटीओ परवाना इत्यादी सर्व खर्च वाहनधारकास करावा लागेल. ५) आपले वाहन कमांक, वाहनाचा प्रकार (कंपनी मेक) त्याचा स्पष्ट उल्लेख करावा व वाहनाचे मॉडेल २०१३ पूर्वीचे नसावे. ६) वाहनाचा विमा पुर्ण (कॉम्प्रीहेन्सिव्ह) असणे आवश्यक आहे. ७) आपल्या वाहनाचा प्रतीदिन दर रु. (अक्षरी--) याप्रमाणे सर्व करांसह (सेवाकर व इत्यादि) कोटेशन मध्ये नमूद करावे. ८) कोटेशन सोबत पुढीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करण्यात यावी -------- अ) आर.सी.बुक ची झेरॉक्स प्रत ब) परमीट वैधता प्रमाणपत्र क) इन्शोरन्स प्रमाणपत्र ड) फिटनेस प्रमाणपत्र इ) टॅक्स पावती व पीयुसी प्रमाणपत्र ई) वाहनधारकाचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व वाहनचालकाचा परवाना इत्यादि सर्व कागदपत्रांची ॲटेस्टेड प्रती सोबत जोडाव्यात. ९) कोणतेही एक अथवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवलेला आहे. १०) इतर तपशिलवार अटी व नियमांची माहिती उपरोक्त पत्त्यावर कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल. ११) भाडयाच्या वाहनाचे बाबतीत कंपनीचे नियम व अटी आपणांस लागु राहतील.

कार्यकारी अभियंता
चाचणी विभाग, नासिक

प्रत सविनय सादर -
१. मुख्य अभियंता, अउदा बाधकाम तथा संवसु परिमंडल, नासिक रोड
२. अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, नासिक
३. अधीक्षक अभियंता, चाचणी तथा दुरसंचरण मंडल, नासिक
प्रत सादर-
३. लेखाधिकारी, अउदा संवसु मंडल, नासिक
४. नोटीस बोर्ड